ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

# CONTENTS


| Sr. No. | Name & Author | Pages |
|---|---|---|
| 15 | Transfers and Promotions: Effective Tools for Employee Empowerment<br>**Prof. Dr. Hemant V. Bonde (Patil)** | 74-76 |
| १ | सूक्ष्म चिंतन - काळाची गरज<br>**प्रा. सुनिल दादाराव पवार** | १-३ |
| २ | वामनदादा कर्डक यांनी प्रबोधनाचा परिघ पूर्ण करणारी कविता (आत्मभान, आत्मपरीक्षण, आत्मटीका)<br>**प्राचार्य डॉ. निशिकांत आलटे** | ४-८ |
| ३ | सार्वजनिक ग्रंथालये आदिवासींचे माहिती साक्षरतेचे मूळ स्त्रोत<br>**डॉ. वीणा कांबळे**<br>**कामडी लाशा बुधा** | ९-१४ |
| ४ | पाथडी कॅम्प चे शिल्पकार : स्वा. सै. श्री. काशीनाथराव जाधव<br>**श्रीमती जाधवर शांता नानासाहेब** | १५-१७ |
| ५ | स्वामी विवेकानंद यांचे जीवन व कार्य<br>**डॉ. अर्चना शिंदे**<br>**डॉ. दैवत वि. सावंत** | १८-२० |
| ६ | जिंतूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांच्या समस्यांचा एक चिकित्सक अभ्यास<br>**गिरी दिलीप मोतीगिर** | २१-२६ |
| ७ | उन्हाळी शिबिरास येणाऱ्या मुलांमध्ये पर्यावरणाप्रती योग्य अभिवृत्ती निर्माण करण्यासाठी कार्यक्रम निर्मिती आणि त्या कार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे<br>**डॉ. पुष्पा भाग्यवंत उतकर** | २७-३५ |
| ८ | पाली साहित्यातील नैतिक मूल्यांची शिकवण काळाची गरज<br>**डॉ. संतोष पांडुरंग भोसले** | ३६-३८ |
| ९ | राजर्षी शाहू महाराजांनी विकासासाठी कायद्याने केलेले योगदान सोलापूर विद्यापीठ, सोलापूर<br>**श्री. तानाजी पंढरी गायकवाड** | ३९-४२ |
| १० | मराठवाड्यातील 'अ' दर्जाच्या वृत्तपत्रांनी कबड्डी संघटना व जिल्हा क्रीडाअधिकारी यांनी घेतलेल्या कबड्डी स्पर्धेच्या प्रसिध्दीचा तुलनात्मक अभ्यास<br>**रामदास भुजंगराव कैंद्रे** | ४३-४४ |
| ११ | समूहभाव व श्रमनिष्ठा यातून प्रकट होणारी ग्रामीण परंपरा आणि राजन गवसांची कादंबरी<br>**प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले** | ४५-४८ |


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

**'रॉयल'** या सहामाही प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी स्वत: लेखकावर राहील.
हे नियतकालिक मालक, मुद्रक, प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर ॲण्ड प्रिंटर्स, जयसिंगपुरा, विद्यापीठ गेट, औरंगाबाद येथे मुद्रित व प्रकाशित केले.

ATION SOCIETY'S ... COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# समूहभाव व श्रमनिष्ठा यातून प्रकट होणारी ग्रामीण परंपरा आणि राजन गवसांची कादंबरी

प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले
प्रमुख, मराठी विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर जि. नांदेड

मराठी साहित्यामध्ये विशेषता ग्रामीण कादंबरी वाङ्मयामध्ये राजन गवस यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या कळप, धिंगाना, ट, चौंडकं, भंडारभोग याकादंबऱ्यानी मराठी साहित्यविश्वात वेगळा ठसा उमटविला आहे. अलिकडे ब- बळीचा ही त्यांची कादंबरी खूप . त्यांच्या कादंबऱ्यांच्या आधाराने समूहभाव व श्रमनिष्ठा यातून प्रकट होणारी ग्रामीण परंपरा विशद करण्याचा माझा प्रयत्न आहे.

राजन गवसांची कादंबऱ्यामधील समूहभावाचे चित्रण: हजारो वर्षाच्या जगण्याच्या संघर्षातून कृषी संस्कृतीच्या मानवाने समूहभाव आणि भाव निर्माण झला आहे. काळ बदलला, व्यावहारिक संदर्भ बदलले पण शेतीव्यवस्थेचा माणूस समूहापेक्षा वेगळा असू शकत नाही. निसर्गाशी दोन करण्यासाठी त्याला पदोपदी समूहाचीच आवश्यकता भासते. राजन गवस यांच्या साहित्यातून कृषीसंस्कृतीत वावरणारा समूह आलेला आहे. कट' याकादंबरीचे आशयसूत्र हे दलित- सवर्णच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आहे , कादंबरीच्या केंद्रवर्ती 'कबीर' हे पात्र असून गाव पातळीवरच्या त-सवर्णाच्या संघर्षालाच केंद्रस्थानी ठेवले आहे. कादंबरीच्या प्रारंभीच गाव- म्हारोड्यावर आलेले अशुभत्व सूचकतेने वर्णन केले आहे, तेअसे क काळा ढग गावच्या चावडीवर आला नंतर तो सरकत सरकत म्हारोड्यावर स्थिर झाला.. म्हारवाड्याच्या मध्यभागी असलेली तक्क्याची इमारत ढीच बंगलोरी कवलं सांभाळत उभी. बाकी सगळी खोपटं कुळंकुठं काळ्याठिक्कर पडलेल्या खापज्या. तर काही खोपटांवर उसाचा काळपट पडलेला ा. अशात भिमाबा म्हार आणि गोपाळ म्हाराची पक्क्या विटांची घरं सगळ्यात उठून दिसणारी त्यांच्या चौकटीला लालभडक रंग लावलेले. त्यामुळं चं ठळकपण अधिकच जाणवणारं. एकाच गल्लीचा म्हारोडा. तीस चाळीस घरं. गल्लीत सगळीकडं खडी उठलेली. मध्येमध्ये मोठाले खड्डे त्यात पाणी चललं वर घुंगुरट्यांचा तवंग... म्हारोड्याच्या खालच्या बाजूलाच मांगोडा. त्याच्या थोड्या वरच्या बाजूला वडारांची पन्नासाठ घरं लागूनच गावाला रूवात होते, चार गल्ल्यांचं गावडड[२] कादंबरीची सुरुवातच येथून होते. कादंबरीचे आशयद्रव्य हे गाव रचनेच्या समूहाला समतोल दर्शविणारे आहे. बंध कादंबरीमध्ये गाव विरूद्ध म्हारोडा असाच संघर्ष रंगलेला आहे. एका व्यक्तीच्या भोवती कथानक फिरत नाही, तर सबंध गावच केंद्रवर्ती आहे. ळासाहेब शेडबाळेच्या फसवणकीनंतर उद्ध्वस्त झालेला म्हारवाडा हा समूहानेच येतो, "एक नवं बकालपण सगळ्याच्या तोंडावर वस्तीला आलं... गात सापडलेल्या वस्तीसारखा म्हारवाडा भयभीत झाला."[२]

'धिंगाणा' याकादंबरीतून गाव पातळीवरील राजकारणाचा वेध घेतला आहे. बदलती राजकीय मूल्यव्यवस्था चित्रित करताना लेखकाने संग्या बाबल्या सारखी शिक्षित समविचारी तरुणांची गँग विरूद्ध जुनी, सत्तेला चिकटून असलेली राजकारणी मंडळी यांच्या परस्परविरोधी पॅनलमुळे ग्रामपंचायतच्या निवडणुकीच्या निमित्ताने सगळा गाव ढवळून निघतो. यामध्ये कादंबरीचा ७० टक्के भाग खर्ची पडला आहे. शिवाय हे अमुक एक गाव असं आहे असेही नाही, "हे गाव प्रजासत्ताक महाराष्ट्रातील कोणतेही असू शकेल,"[३] स्वातंत्र्यप्राप्तीच्या पंचवीस-तीस वर्षातील राजकीय मूल्याचा ऱ्हास होत असल्याचे चित्र या निमित्ताने येते. एका निवडणुकीच्या एका पॅनलचा खर्च बाबल्याच्या मुखातून सांगितला आहे तो "एकूण आपल्या पॅनलला साठ हजार रूपये खर्च आला. हा सामाईक ज्यानं त्यानं केला, तो वेगळा ह्यात नुसत्या दारूवर एकोणीस हजार गेले,"[४] खर्च ग्रामपंचायत निवडणुकीत सर्वत्रच होतो. जर चाळीस पन्नास हजार रूपये दारूवर खर्च होत असतील तर गावच्या व्यवस्थेवर होणारे बरे-वाईट परिणाम हा चिंता आणि चिंतनाचा विषय आपल्यासमोर येतो. वैरभावातून गावाच्या समूह आणि सहानुभावाला जात असलेला तडा येथे चित्रित केला आहे.

### कृषिसंस्कृतीतील सण उत्सवाचे दर्शन

शेतीसाठी सर्वात उपयुक्त प्राणी बैल. वर्षभर कष्ट उपसणाऱ्या बैलासाठी भाद्रपद महिन्यात बैलपोळा साजरा करून त्याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते. आपल्या आजूबाजूच्या पशू पक्षी, निसर्ग याविषयीची कृतज्ञता हे कृषी संस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. गाव पातळीवरी

DEGLOOR
Dist.Nanded



समूहाने बैल पोळ्याच्या स्वागताची धावपळ 'चौंडकं' मधून पुढीलप्रमाणे- "सगळी गल्ली निरनिराळ्या वासांनी घमघमाय लागलीती. घराघरा अंघोळ्या गुळवण्या, ओवाळण्या चालू होत्या. व्हागाडाच्या दारात पोरांनी धूडगूस घातलाता. शेजारी कसाळांच्या घरातली पोरं आपल्याच ताला नवी कापडं घालून मिरवत होती. मोज्याच्या घरासमोर भलीमोठी बोज्याएवढी जागा सारवून रांगोळी घातलीती. प्रत्येकाची धावपळ सुरूच होती."

कृषी समूहात व्यक्तीपेक्षा कुटूंब महत्त्वाचे, संयुक्त कुटूंब म्हणजे छोटा समूहच. समूहामध्ये भावनिक ऐक्य साधले जाते. एकत्र राहणं सामाजिक, मानसिक आणि भावनिक फायद्याचे असते. पण साठोत्तरी कालखंडात याला तडा गेला. मध्यमवर्गीय नागर शरण व्यवस्थेने खेड्यांच्या जीवनावर आक्रमण केले आणि सगळेच फिसकटले. याचे चित्रण राजन गवस यांच्या साहित्यातून येते. शेतकऱ्याच्या जीवन शैलीत सहकार्याची स्वाभाविक प्रवृत्ती असते.. सर्वसमावेशक संस्कृती, वैरभाव असेल तरी सहकार्याची भावना, दलित सवर्णांच्या संघर्षानंतर दलिताकडून सवर्णांवर केशोर दाखल झाल्यावर सुद्धा गावात तणावग्रस्त वातावरण असतानाही परस्परांना मदत करणे याचे संदर्भ पुढीलप्रमाणे आढळतात. तुका खांबलाच्या खळ्यावर आलेल्या आक्काबाई म्हारीनला परत न पाठवता पसाभर तरी दिले जाते. गज्या मुळकाच्या दारात जाऊन घ्मालक कुठंतरी घ्या कामाला, काय निबवणा झालंय' म्हणणाऱ्या जाणबा म्हाराला गज्या मुळकानं आत जाऊन मालकिणीला भाकरी घालाय सांगितली. तर उद्ध्वस्त झालेल्या महारवाड्याला वाचवायला आक्काबा राणे धावून येतो. हा सहानूभाव कृषी संस्कृतीच्या संस्काराचा आहे. तो राजन गवस यांच्या साहित्यातून येतो.

### श्रमनिष्ठा

श्रमाशिवाय जगणे कृषीसंस्कृतला मान्य नाही. कृषी संस्कृतीत तर श्रमाची अधिक आवश्यकताअसतेच. ढोंगी, लाचारी, मिरवेगिरीला येथे थारा नाही. शेतीनिष्ठांच्या संस्कृतीत श्रमाला मूल्य व श्रमाला प्रतिष्ठा असणाऱ्या साहित्यात राजन गवसाच्या कादंबऱ्यांचा समावेश होतो. घ्तणकटङ मधील बाळासाहेब शेडबाळे आणि दादू हेडी दोघांनी मिळून गावच्या दूध डेअरीमध्ये साठ हजाराचा भ्रष्टाचार करतात. गाव संस्कृतीच्या संस्कारित तराळ थळबा आजाला हे पटत नाही. तो कबीरला म्हणतो - घ्दाद्यानं म्हणं, डेरीतलं पैसं खाल्लं. सगळं गाव थुकाय लागलंय. काय व्हायलं न्हाई गड्याङङ थळबा आजासारख्याना हा दादूचा ऐदीपणा मान्य नाही. पतसंस्था, बँक यात आर्थिक भ्रष्टाचार करणारा बाळासाहेब गावसंस्कृतीत तग धरू शकत नाही. त्याला गाव सोडून पळून जावे लागते. श्रमाला निष्ठा मानणारा माणूस गाव व्यवस्थेत तग धरतो. त्यामुळे श्रमाशिवाय आपल्याला काही मिळावे ही अपेक्षाही कुणी करत नाही. लेकरा-बाळासहीत उपाशी असणारा जानबा म्हार गज्या मुळकाच्या दारात जाऊन श्रमाच्या बदल्यात भाकरी मागतो. तो भीक मागत नाही. घ्कष्टाला घ्या पण भाकरी द्या!ङ म्हणून विनंती करतो, घ्मालक , कुठंतरी घ्या कामाला काय निबवना झालय. बिराड तर खुळ्यापिस्यागत कराय लागलंयङङ ७ भूकेने अगतिक आहे , पण त्याबदल्यात तो कष्ट करायला तयार आहे.

'तणकट' च्या केंद्रवर्ती असणारा कबीर सदाशिव कांबळे हा कॉलेजात शिकणारा, पायी येजा करणारा समन्वयवादी समतोल विचार करणार तरूण, कॉलेज करून फावल्या वेळात घर- दार शेतीत आई-वडिलांना कामात मदत करणारा, वेळप्रसंगी मजूरीला जाणारा, शेळी राखणारा, श्रमाची त्याला लाज बाळगणारा नाही. उलट श्रम न करता आईवडिलांच्या कष्टावर बसून खाणाऱ्या पोरांबद्दल त्याच्या मनात चिड दाखविणारा आहे. सवर्णांशी झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर फणींद्र कांबळे व कबीर यातील संवाद मार्मिक आहे. "चिक्कार पोरं अशी आहेत सर, की दहावी बारावीला नापास होऊन म्हारोड्यात आणि तालुक्यात फिरत असतात. त्यांना घरातली म्हसरं फिरवायची लाज वाटते. कुणाच्या बांधाला जायचं तर सोडाच. मग ह्या पोरांच्या पोटाला त्यांच्या आई बापानं राबून घालावं लागतंय. अशा म्हारोड्यात तुमचा संघर्ष काय कामाचा ?"[८] श्रमनिष्ठा जोपासण्याकडे लक्षवेधण्याचा लेखकाचा कल आहे.

### बेरोजगारीचे दर्शन

वर्तमान वास्तवाची नेमकी बाब राजन गवस यांनी पकडली आणि सुधारणेच्या नावाखाली आलेल्या शिक्षणव्यवस्थेने तरूणांना धड शेती नाही आणि उद्योग-व्यवसाय नोकरीही नाही. परिणाम काय तर शाळा महाविद्यालय म्हणजे सुशिक्षित बेरोजगारीचे कारखाने, आणि गहाण पडलेला स्वाभिमान बरोबर हीच गोष्ट राजकारण्यांनी हेरली. बेकारांना आपल्या दावणीला बांधले याचे चित्रण धिंगाणा, कळप, तणकट मधून राजन गवसांनी केले आहे. प्रा. महाजन सरांच्या घरी प्रा. पवार, दिलावर गडकरी, आणि रघू चिलमी यांची राजकारणावर चर्चा चालू असताना प्रा. महाजन म्हणतात, घ्आम्ही विद्वान म्हणवणारेच अधिक लाचार असतो. अडाणी माणूस फार स्वाभिमानी. शिकला की लाचार झाला असं समीकरण झ ालंय.ङङ ९ यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना रघू म्हणतो, घ्आमचे लोक शिकले की लाचार होतात. त्यांना स्वाभिमान गहाण ठेवण्याचंच शिक्षण

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

अडाणी माणूस आपल्या मूळ परंपरेला चिकटून आहे आणि त्यांच्या परंपरा स्वाभिमानाच्या आहेत. त्यामुळं मला तर अलीकडं रेच्या लोकांनी त्या शाळातून शिकूच नये म्हणजे भारताचं भलं होईल असं वाटाय लागलंयडङ१० ही प्रतिक्रिया शिक्षणामुळे श्रमनिष्ठेपासून कसा दूर चालला आहे, स्वाभिमान गमावून बसत आहे, हे त्यातून सूचित केले आहे.

राजन गवस यांच्या कादंबरी वाङ्मयातून देवदासींच्या भयावाह जीवनाबरोबर शिक्षण, सहकार आणि राजकारणाचा बज्या वाईट प्रभावामुळे स्कृतीच्या मूल्यव्यवस्थेवरील परिणामाच्या विषय घ्धिंगाणाड, घ्कळपङ, घ्तणकटङ यामधून चित्रित झाला आहे.

मौखिक परंपराचा अभिव्यक्तीसाठी उपयोग : पर्यावरणीय प्रबोधनाच्या खुणासह मराठी साहित्य परंपरेत मौखिक अभिव्यक्तीचा उपयोग हित्य, महानुभाव साहित्यामध्ये सक्षमपणे केलेला आहे, तितक्या सक्षमपणाने आधुनिक साहित्याने किंवा साठोत्तरी कालखंडातील विविध प्रवाहाने घेतलेला नाही. वसाहतवादी मानसिकतेतून पाश्चात्य अनुकरणाने मराठी साहित्य पुरेसे परपुष्ट झाले नसल्याचा उल्लेख बा. सी. मर्ढेकरांनी केलेला तो. परकीय तसेच यासंदर्भात म. द. हातकणगलेकर यांच्या मताचाही आधार घेतला येईल . ते म्हणतात, घ्जे काही पाश्चात्याकडून घेतले ते तज्हेने आत्मसात झालेले नाही आणि स्वदेशी वाङ्मय परपंरेशी अर्थपूर्ण वाढ करण्यासाठी त्याचा उपयोग करण्याची पद्धत काय असेल याची नही शोध आपल्याला लागलेला नाही"[११] या आणि अशा काही कारणामुळे देशी वाङ्मयाच्या अभिव्यक्तीच्या परंपरेचा विसर पडला, " लीळा त्रापासूनचे प्राचीन गद्य, वारकरी संप्रदायाची बळकट चळवळ, शाहिरी, तमाशा, भजन, गोंधळाचा सशक्त वारसा या सगळ्यांच्या स्वीकृतीतून नवी णी करता आली असती,"[१२] पण असे होऊ शकले नाही हे वास्तव एका मुलाखतीत लेखकाने नोंदविलेले आढळतात.

## साहित्य लेखनविषयक चिंतन

आशय विषयाच्या मागणीतून लेखक लिहिण्याच्या विविध शक्यता शोधत असतो. तर काही वेळा नवे काही प्रयोगही करीत असतो, पण सर्गिकता जपत असताना लोकपरंपरेची बलस्थानं त्याला माहीत असावी लागतात, त्याची जाण आणि भान असावे लागते. किमान संस्कृतीशी मांडलेल्या लेखकाने या बाबतीत सजग असले पाहिजे. साहित्य मंडळाच्या नवलेखक शिबिरात कथा कृती सत्रात कथा वाचनानंतर कथेच्या फॉर्म बद्दल चर्चा सुरु होते, त्यावेळी आपली भूमिका मांडताना रघू चिलमीचे मत येथे पुरक ठरते. घ्ह्या महाराष्ट्रातल्या नव्वद टक्के खेड्यात एक विकसित कथेचा फॉर्म आहे. त्याचा अभ्यास न करता इंग्रजी कथावरून कथा लिहिण्यात इथल्या पांढरपेशा लोकांनी धन्यता मानली. हेच सगळ्यात गोंधळ करून टाकणारं आहे. मला तसं लिहू नये असं म्हणायचं नाही. तसं पुण्या मुंबईच्या लोकांनी लिहावं पण आपल्या खेड्यातल्या नव्या लेखकाला तसंच फडके अथवा गाडगीळ तंत्रानं लिहायची काय गरज ? त्याला उलट संपन्न कथनपरंपरा उपलब्ध आहे. तिचा शोध त्यांने घ्यायला हवा. हे लोक खेड्याच्या गावांची नावं सांगतात आणि कथा मात्र पांढरपेशासारखीच लिहितात.डङ१३ वसाहतवादी मानसिकतेमुळे आपल्या अस्त्विविषयी त्यामुळं निर्माण झालेल्या न्यूनगंडाविषयी रघूला बोलावयाचे होते. कथा कविता लिहिणारा रघू मोठ्या आत्मीयतेने साहित्यवर्तूळात वावरतो, आपल्या लेखनाविषयी सुरेश संकेश्वरी बोलताना म्हणतो, घ्मला भजन आणि तमाशा एकत्र मिसळून नाटक लिहायचं आहे, भजनातला सूत्रधार आणि तमाशातला ह्या मावश्या एकत्र आणता आले पाहिजेत. ते दोघे एकत्र आले की, मग आपोआप पुढचं सगळं जमत जाईल.डङ१४ पण सुरेशला हे पटत नाही. "नाहीच पटणार त्याला. त्याची मुळं पेठेतल्या डांबरी रस्त्यात मग कसं काय त्याला पटणार. पण आपण करायचंच"[१५] इ ापाट्याने मध्यमवर्गीय झालेल्या सुरेश संकेश्वरीच्या धारणा या नागरशरण बनलेल्या असतात. पण रघू चिलमी खेडयातल्या मातीसह रूजलेल्या गावपांढरीच्या जाणिवा या मौखिक परंपरेच्या जाणिवा व्यक्त करताना दिसतात. त्यामुळे कथेच्या निर्मिती बाबत चाललेल्या चर्चेत रघू म्हणतो, "मुळात कथा हा प्रकार आमच्या खेड्यातल्या माणसांचा आहे. हे ध्यानात घ्या. त्यामळं हया आमच्या शेतकरी कथेला शेवट मान्य नाही. ती खुलीच असते. वेताळाची गोष्ट ऐकली असेलच आणि मुळात गोंधळ्याची कथा ही मला कथेतली सर्वश्रेष्ठ कथा वाटते. कारण तेवढी रसरशीत कथा मराठीतल्या लेखकानी लिहिलीच नाही. उलट बारक्या बारक्या कथा करून इथल्या मूळ कथेचीच वाट लावली हया लोकांनी आमच्या आईच्या गोष्टी इतकीही मजल त्यांना मारता नाही आली . मग गोधळ्याची कथा गाठयची गोष्ट दूर"[१६], पण चर्चेच्या वेळी शिरगावकर लोककथा वेगळी आणि कथा वेगळी असा बदल करू इच्छित असल्याने पुन्हा रघू म्हणतो, "मुळात इथंच घोटाळा होतोय.आपण लोककथा वगळतोय मला तीच आमच्या मातीची गोष्ट वाटते. तिची सामर्थ्य घेऊन कथा व्हायला पाहिजे होती"[१७] रघू चिलमीच्या साहित्याविषयीधारणा या भूमीशी इमान राखणाज्या आहेत.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



'कळप' कादंबरीची सुरूवात ही रघूच्या आईने सांगितलेल्या लोककथेपासून होते. ही कथा कादंबरीच्या प्रारंभी येणे हे 'कळप' शी असणारे अंत:सूत्र पाहता ती प्रतीकात्मक स्वरूपाची आहे, "आई मला सारखी एकच गोष्ट सांगते. लहान होतो, तेव्हा गोष्ट ऐकायला गंमत यायची. नंतर मात्र ती गोष्ट सांगाय लागली की मी अस्वस्थ... "[१८] केवळ साहित्यातून लोककथेच्या संदर्भात चर्चा करून लेखक थांबत नाही, तर त्याच्या विविध शक्यता पडताळून पाहताना त्याचा प्रयोगात्मक पातळीवर उपयोग करून साहित्यकृतीला आकार देतात.

प्रत्येक संस्कृतीला स्वत:चे एक स्वतंत्र आणि स्वायत्त अस्तित्व असते आणि आपल्या सक्षम परंपरेची जाण असणाऱ्या लेखकाला याची जाणीव असल्याचे येथे प्रत्ययास येते. 'माणसाला किंवा साहित्याला आपापल्या भूमीवरच, आपापल्या भाषिक समूहातच डौलात उभे राहत येते... "[१९] यादृष्टीने डॉ. भालचंद्र नेमाडे याचे वरील मत महत्वाचे वाटते.

**प्राणी, पशू -कीटक या सहीत निसर्ग प्रतिमाचा वापर**

आणि निसर्गासोबत जगणे हेच खरे जगणे ही या साहित्याची धारणा असली पाहिजे. भूमी व तेथील निसर्ग आणि मानव यांच्या जगण्याचे आंतरिक सूत्र हे ग्रामीणतेचे लक्षण आहे. ग्रामपातळीवर निसर्गाचा सहवास, निसर्गाचे अनुकरण, निसर्गाची जगण्याची मदत घेतल्याशिवा गत्यंतर नसते. त्याचे जगणेच निसर्गासह आहे. हवा, पाणी नद्या, झाडे, झुडपे माती प्राणी पक्षी कीटक या सर्वासकट जगण्याला एक जिवंतपणा लाभलेला असतो. मनुष्य आणि निसर्ग यांच्यातील सहसंबंधाचा साहित्य संहितेमध्ये झालेल्या अभिव्यक्तीचे बद्दल वसंत आबाजी डहाके आधिवासशास्त्रीय समीक्षा म्हणतात. या समीक्षेचे एक पाऊल साहित्यात तर एक पाऊल भूमीवर असते. भूमीपासून, निसर्गापासून तुटल्यामुळे मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. 'निसर्गापासून तुटलेपणा, कौटुंबिक नात्याचा अभाव, सामाजिक संस्थांचा विध्वंस, सामूहिक जीवनाचा अभाव, माणसांना घेरणारे एकलेपण भावनाशून्य जीवनाचा वाढत्या प्रमाणातील उबग, निर्मितीच्या आनंदाचा अभाव, मृत्यूचे कमी झालेले भय, धर्म आणि श्रध्दा यां झालेले उच्चाटन, यामुळे माणूस उद्या सर्वार्थाने सुखी होईल असे वाटत नाही.'[२०] ही नागर जीवनशैलीची लक्षणे डॉ. द. ता. भोसले नोंदविलेला आहेत, पण दुर्दैवाने हे खरे ठरताना दिसत आहे. साहित्याचे मूल्य म्हणून या निसर्गासह जगणे आणि त्याप्रती असणारी संवेदनशीलता साहित्य मूल्यमापनासाठी उपयोगी ठरणारे आहे. याचा राजन गवसांच्या कादंबऱ्यातून पानापानवरून परिचय घडतो.

**संदर्भसूची**


१) राजन गवस : धिंगाणा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (पृ.१५४ )

२) कित्ता : (पृ.१५५ )

३) कित्ता : (पृ.१५९ )

४) कित्ता : (पृ.१६० )

५) राजन गवस : चौंडकं. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (पृ. ९८ )

६) राजन गवस : तणकट साकेत प्रकाशन औरंगाबाद (पृ. ११९)

७) कित्ता : (पृ. १२१) ८. कित्ता : (पृ. २१३)

९) राजन गवस : कळप, दर्या प्रकाशन, कोल्हापूर (पृ. ५९ )

१०) कित्ता : (पृ. ६१ ) ११. हाकणंगलेकर म. द. :

१२) राजन गवस यांची मुलाखत

१३) राजन गवस : धिंगाणा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (पृ.१५४ )

१४) कित्ता : (पृ.१६१ ) १५. कित्ता : (पृ. १६३)

१६) कित्ता : (पृ.१६२ ) १७. कित्ता : (पृ.१६७ ) १८. कित्ता : (पृ.१६९ )

१९) भालचंद्र नेमाडे : २०. द. ता. भोसले :


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded